**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांजकडून**

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित**
**विशेष नियोजन प्राधिकरण**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) च्या अनुषंगाने कलम २३ (१) नुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या हवेली, मुळशी, पुरंदर, भोर व वेल्हे या तालुक्यातील ११७ महसुली गावे समाविष्ट असलेल्या २ ग्रोथ सेंटरसाठीच्या अधिसूचित क्षेत्राकरिता विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.*

**सूचना**

क्रमांक म.रा.र.वि.मं./वि.नि.प्रा./उ.व.व्य.स./वि.आ. २०९७/२०२४.-- ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेले) च्या कलम ४० चे पोटकलम *(१ बी)* मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त असलेल्या व इतर सर्व शक्तीस अनुसरून शासनाने, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८२४/१२२०/ प्र.क्र. १११/२०२४/नवि-१३, दिनांक १० ऑक्टोबर २०२४ अन्वये, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील बाह्य वळण मार्ग व त्यालगत एकूण २ ग्रोथ सेंटरचा विकास करणेकरिता हवेली, मुळशी, पुरंदर, भोर, व वेल्हे या पाच तालुक्यांतील ६६८ चौ. कि.मी. क्षेत्र व ११७ महसुली गावांकरिता (या पुढे "उक्त अधिसूचित क्षेत्र" असे उल्लेखिलेले) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील कंपनी) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ *(२)* अन्वये, अधिसूचित क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवयश्क आहे. त्याबाबत उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २१ *(२)* च्या अनुषंगाने कलम २३ *(१)* अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ *(२)* च्या अनुषंगाने कलम २३ *(१)* अन्वये सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उक्त अधिसूचित क्षेत्राच्या विकास योजनेत समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा खालील कार्यालयांत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

(१) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे-१,

(२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत दुसरा मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे-१

(३) महामंडळाचे संकेतस्थळ *http://msrdc.in.*

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे-१ यांचे कार्यालयात लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करताना, त्या सूचना / हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

*महामंडळाच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार*

**अनिलकुमार ब. गायकवाड,**
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित,
विशेष नियोजन प्राधिकरण, पुणे.

पुणे, ९ डिसेंबर २०२४.

---

**BY VICE CHAIRMAN AND MANAGING DIRECTOR**

**MAHARASHTRA STATE ROAD DEVELOPMENT CORPORATION LTD.**
**SPECIAL PLANNING AUTHORITY**

*Declaration of Intension to prepare a Development Plan as per Section 23* (1) *read with Section 21* (2) *of Maharashtra Regional and Town Planning Act 1966. for the Notified Area of 2 Growth Centers comprising of 117 villages of Haveli, Mulshi, Purandar, Bhor and Velhe talukas along Pune Outer Ring Road in Pune district having MSRDC As a SPA.*

## NOTICE

No. M.S.R.D.C./S.P.A./V.C. & M.D./D.P./2097/2024.— Whereas, the Government of Maharashtra in exercise of its powers conferred under sub-section *(1-B)* of the Section 40 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared Maharashtra State Road Development Corporation Limited as a Special Planning Authority (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the SPA") by Notification No. TPS-1824/1220/C.R. 111/2024/UD-13, dated 10th October 2024 (hereinafter referred to as "the said Notification") for the Development of the Outer Ring Road and 2 Growth centers along Outer Ring Road in PMRDA jurisdiction having area of 668 k.m. square comprising 117 revenue villages of Haveli, Mulshi, Purandar, Bhor and Velhe talukas. (hereinafter referred to as the "said notified area")

and whereas, under Section 21 *(2)* of the said Act it is necessary to prepare a Development Plan for the said notified area for Comprehensive and Planned Development. In this regard, the SPA has approved the declaration of intention to prepare a Development Plan under Section 23 *(1)* in accordance with Section 21 *(2)* of the said Act.

and whereas, in that regard this notice is being published under Section 23 *(1)* in accordance with Section 21 *(2)* of the said Act.

and whereas, the plan showing boundary of the said notified area is kept open for inspection by public on office working days, during office hours at the following offices.

1. Vice Chairman and Managing Director, Maharashtra State Road Development Corporation, 1st floor, New Administrative Building, opposite Council Hall, Pune.
2. Office of the Joint Director, Town Planning, Pune Division, Pune, 2nd floor, New Administrative Building, opposite Council Hall, Pune.
3. Website of the corporation *http://msrdc.in.*

Any suggestions/objections of the public in this regard may be filed in writing to the VC and MD, MSRDC-SPA having its office at Vice Chairman and Managing Director, Maharashtra State Road Development Corporation, 1st floor, New Administrative Building, opposite Council Hall, Pune. Within a period 60 (Sixty) days from the date of publication of this notice.

*By the order of Board of the Directors of the corporation*

**ANILKUMAR B. GAIKWAD,**
Vice Chairman and Managing Director,
Maharashtra State Road Development Corporation Limited,
Special Planning Authority, Pune.

Pune, 9th December 2024.

---

**मुख्याधिकारी तथा प्रशासक यांजकडून**

**अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट**

*महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) प्रमाणे*

**जाहीर प्रसिद्धीकरण**

क्रमांक अ.न.प./नगर रचना विभाग-११/संकलन-४/कावि/२०२४.-- अक्कलकोट शहराची विकास योजना मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७०९/३०५५/सीआर/२०१५/०९/वि.यो. मंजुरी /नवि-१३. दिनांक २१ डिसेंबर २०११ अन्वये मंजूर झालेली असून ती दिनांक २ फेब्रुवरी २०१२ पासून अंमलात आलेली आहे. अक्कलकोट शहर विकास योजना अहवालाप्रमाणे, आरक्षण